प्रकरण नं.०४

उपभोग, गुंतवणूक आणि बचत
(Consumption, Investment and Saving)

उपभोग फलन : (Consumption Function)

उत्पन्न आणि उपभोग खर्चाच्या सहसंबंधाचे विश्लेषण केन्स यांच्यापूर्वी अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केले आहे. यामध्ये मार्शल, माल्थस, पिगु या शास्त्रज्ञांचा समावेश होतो. केन्स यांनी आपल्या रोजगार विषयक सिद्धांतामध्ये उपभोग फलन या संकल्पनेचा आधार घेतला आहे. त्यांच्या मते, देशातील एकूण रोजगार पातळीही प्रभावी मागणीवर अवलंबून असते तर प्रभावी मागणी ही एकूण मागणी फलन व एकूण पुरवठा फलन यावर अवलंबून असते. एकूण मागणी फलन हे एकूण उपभोग खर्च आणि एकूण गुंतवणूक खर्च या दोन घटकांवर अवलंबून असते. थोडक्यात असे म्हणता येईल की, रोजगार पातळी निर्धारणाचा महत्त्वाचा घटक म्हणजे उपभोग खर्च होईल.

उपभोग फलन - अर्थ : (Meaning of Consumption Function)

प्रभावी मागणी ही उपभोग फलन आणि गुंतवणूक फलन या दोन घटकांवर अवलंबून असते. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, उपभोग हा व्याजदरावर अवलंबून असतो. व्याजदरातील बदलामुळे उपभोग आणि बचत यावरील खर्चात बदल घडून येतात. थोडक्यात सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी उपभोगाचा संबंध व्याजदराशी जोडला आहे. मात्र केन्स यांच्या मते, व्याजदरापेक्षा उत्पन्न पातळी उपभोगावर अधिक प्रभाव पडतो.

उपभोग खर्च म्हणजे उत्पन्नाची एक विशिष्ट पातळी असताना त्या उत्पन्नातून उपभोगावर केला जाणारा खर्च होय. उपभोग खर्च हा समाजातील व्यक्ती, कुटुंब आणि संस्था यांनी केलेल्या खर्चावरून ठरतो. थोडक्यात उपभोग हा उत्पन्न पातळीवर अवलंबून असतो.

“उपभोग आणि उत्पन्न पातळी या दोघांतील कार्यात्मक संबंधाला उपभोग फलन असे म्हटले जाते.”

सूत्ररुपाने,

$$C = f(Y)$$

यामध्ये, C = उपभोग

F = कार्यात्मक संबंध

Y = उत्पन्न पातळी

थोडक्यात, उपभोग हे उत्पन्नाचे फलन आहे.

सीमांत उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume) :

एकूण उपभोगात होणाऱ्या बदलांचे एकूण उत्पन्नात होणाऱ्या बदलांशी असणारे प्रमाण म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती होय. थोडक्यात एकूण उपभोग खर्चात होणारा बदल आणि एकूण उत्पन्नात होणारा बदल यांचे गुणोत्तर म्हणजे सीमांत उपभोग प्रवृत्ती होय.

सूत्ररुपाने,

$$MPC = \Delta C / \Delta Y$$

यामध्ये,

MPC = सीमांत उपभोग प्रवृत्ती

ΔC = उपभोग खर्चात होणारा बदल

ΔY = उत्पन्नात होणारा बदल

किंवा

$$\text{सीमांत उपभोग प्रवृत्ती} = \frac{\text{उपभोग खर्चात होणारा बदल}}{\text{उत्पन्नात होणारा बदल}}$$

याचा अर्थ बदललेल्या उपभोग खर्चास बदल झालेल्या उत्पन्नाने भागले असता सीमांत उपभोग प्रवृत्ती मिळते. केन्स यांच्या मते, सीमांत उपभोग प्रवृत्ती नेहमी धन असते परंतु एक पेक्षा कमी असते.

सीमांत उपभोग प्रवृत्ती पत्रक-

एकूण उत्पन्न कोटी रुपये	एकूण उपभोग कोटी रुपये	एकूण उत्पन्नातील बदल	एकूण उपयोगातील बदल	सीमांत उपभोग प्रवृत्ती
१००	८०	-	-	-
२००	१७०	१००	९०	९०/१००=०.९०
३००	२५०	१००	८०	८०/१००=०.८०
४००	३२०	१००	७०	७०/१००=०.७०

वरील पत्रकात एकूण उत्पन्नातील बदल आणि एकूण उपभोगातील बदल यांच्या गुणोत्तरावरून सीमांत उपभोग प्रवृत्ती काढली असून ती घटत असल्याचे दिसून येते.

सीमांत उपभोग प्रवृत्तीचे महत्व-

१. सीमांत उपभोग प्रवृत्तीच्या आधारे उपभोगाचा मानसशास्त्रीय नियम स्पष्ट करता येतो.

२. अर्थव्यवस्थेचे संतुलन अपूर्ण रोजगार पातळीला का होते याचे स्पष्टीकरण या संकल्पनेमुळे मिळते.

केन्स यांचा उपभोगासंबंधीचा मानसशास्त्रीय नियम :
(Keynes Psychological Law of Consumption)

सन १९३६ मध्ये प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जे.एम.केन्स यांनी रोजगार, व्याज आणि पैशाचा सर्वसामान्य सिद्धांत प्रसिद्ध केला. त्यांनी आपल्या रोजगार विषयक सिद्धांतामध्ये उपभोग फलन व त्याबाबत मानसशास्त्रीय नियमाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, मानवी स्वभावाच्या आपल्या स्थानावरून प्रथमदर्शनी तसेच अनुभवलेल्या वस्तुस्थितीच्या तपशीलावरुन आपण ज्यावर आत्मविश्वासाने राहू शकतो असा मानसशास्त्रीय नियम असा की, "उत्पन्न वाढेल तसा उपभोग वाढतो परंतु उत्पन्न जितके वाढते तितकाच उपभोग वाढून देण्याची सर्वसाधारण व सार्वत्रिक अशी मनुष्य प्रवृत्ती असते."

प्रा. केन्स यांचा हा नियम उपभोगत्याची सामान्य प्रवृत्ती दर्शविणारा असून तो पुढील तीन बाबींवर आधारित आहे.

१. उत्पन्नात वाढ झाली असता उपभोग खर्चात वाढ होते परंतु उपभोग खर्चातील वाढ उत्पन्नातील वाढीपेक्षा कमी असते.

२. उत्पन्नातील वाढ उपभोग खर्च आणि बचत या दोन घटकात विभागली जाते. याचाच अर्थ वाढलेले सर्वच्या सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च होत नाही तर त्यातील काही भागाची बचत होते.

३. जेव्हा व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ होते तेंव्हा उपभोग खर्च आणि बचत या दोन्हीमध्ये वाढ होते.

वरील तीनही विधाने पत्रकाच्या व आकृतीच्या आधारे स्पष्ट करता येतील.

उपभोग फलन पत्रक - (आकडे कोटी रु.)

उत्पन्न	उपभोग	बचत
00	05	-05
50	60	-10
100	100	00
150	145	05
200	190	10
250	235	15
300	280	20

वरील पत्रकामध्ये उपभोग फलनाचे पत्रक दर्शविले असून ज्या वेळेस उत्पन्न शून्य असते त्या वेळेस उपभोग रु. ०५ कोटी इतका आहे म्हणजेच उपभोगाशिवाय आपण जगू शकत नाही. अशावेळी उत्पन्न नसले तरी नातेवाईक मित्र यांच्याकडून उधार किंवा उसनवार करून उपभोग घेतला जातो. पुढे उत्पन्न जसे वाढत जाते तसा उपभोग व बचत यातही वाढ होताना दिसते. केन्स यांच्या मते उत्पन्न व उपभोग यांच्या समानतेनंतर उपभोग हे उत्पन्नाचे घटते फल असते.

आकृतीच्या आधारे स्पष्टीकरण -



आकृतीमध्ये OX अक्षावर उत्पन्न आणि OY अक्षावर उपभोग दर्शविला असून उपभोग वक्र घटता आहे. उपभोग उत्पन्नापेक्षा कमी असल्यामुळे बचतीची निर्मिती होते. जस जसे उत्पन्न वाढते तशी बचत देखील वाढते. केन्स च्या उपभोग फलनास निरपेक्ष उत्पन्न सिद्धांत असेही म्हणतात.

उपभोगाच्या मानशास्त्रीय नियमाची नियमाची गृहीते :

१. वर्तमानकालीन मानसशास्त्रीय आणि संस्थात्मक घटकांची स्थिरता :

उत्पन्नाचे कार्य आहे. उत्पन्नाचे वितरण, किंमतीची पातळी, लोकसंख्या वृद्धीदर, लोकांच्या आवडीनिवडी, सवयी, रूढी, परंपरा इत्यादी संस्थात्मक आणि मानसशास्त्रीय घटकात कोणताच बदल होत नाही.

२. परिस्थिती सामान्य असून त्यात बदल होत नाही :

अर्थव्यवस्थेत सामान्य परिस्थिती अस्तित्वात असते. युद्ध, राजकीय उलथापालथ, आकस्मिक स्थिती इत्यादी असामान्य घटना घडत नाही.

३. निरहस्तक्षेपांवर आधारित श्रीमंत, समृद्ध आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अस्तित्व:

हा मानसशास्त्रीय नियम गरीब देशांसाठी लागू ठरत नाही. कारण गरीब देशात उपभोग आणि बचत यामधील निवडीचा प्रश्नच उद्भवत नाही. कधीकधी या देशांमध्ये संपूर्ण उत्पन्न उपभोगावर खर्च होते. म्हणजेच प्रसंगी कर्ज देखील घ्यावे लागते.

उपभोग फलनावर परिणाम करणारे घटक (निर्धारक घटक):

उपभोग फलनाचे निर्धारक घटक पुढील प्रमाणे सांगता येतात-

A) व्यक्तिनिष्ठ घटक:

१. दूरदृष्टीचा हेतू :

भविष्यकाळात येणाऱ्या या समस्यांना तोंड देण्यासाठी अथवा गरजा भागवण्यासाठी लोक आपल्या उत्पन्नाचा काही भाग राखून ठेवतात म्हणजे वर्तमान उपभोग खर्च हा कमी होतो याचाच अर्थ दूरदृष्टीच्या हेतूने मिळालेल्या उत्पन्नापैकी काही भाग राखून ठेवला जातो. उदाहरणार्थ मुलांचे शिक्षण, वृद्धापकाळ इत्यादी.

२. तरतुदीचा हेतू:

भविष्यामध्ये किंवा अचानकपणे येणाऱ्या अडचणींचा सामना करता यावा यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नापैकी काही भाग उपभोगावर खर्च न करता रोख स्वरूपात आपल्या जवळ ठेवतात. उदाहरणार्थ आजारपण, अपघात इत्यादी संकटांसाठी ही तरतूद केली जाते.

३. हिशोब हेतू:

आपल्याला व्याजाच्या स्वरूपात किंवा किंमत वाढीच्या मार्गाने जादा रक्कम मिळावी म्हणून उत्पन्नातील काही भाग राखून ठेवला जातो.

४. प्रगतीचा हेतू:

भविष्यकाळात अधिकाधिक उंचावणारे रहाणीमान उपभोगावयास मिळावे तसेच आपली प्रगती व्हावी असे प्रत्येकालाच वाटते त्यासाठी व्यक्ती आपल्या उत्पन्नातील काही भाग बचत करते.

५. स्वावलंबनाचा हेतू:

प्रत्येक व्यक्तीस आपण स्वावलंबी असावे असे वाटते यासाठी व्यक्ती उपभोग खर्चात कपात करून बचतीत वाढ करते.

६. व्यवसाय हेतू:

कोणताही उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. लोक उपभोग खर्चात कपात करून बचत करतात. बचतीत वाढ झाल्यामुळे भांडवलाची निर्मिती होते.

७. सामाजिक प्रतिष्ठा हेतू:

समाजात श्रीमंत लोकांना अधिक प्रतिष्ठा असते. म्हणून प्रतिष्ठेच्या हेतूने लोक अधिक बचत करून श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतात.

८. इतर हेतू:

प्रा.केन्स यांनी उपभोगावर परिणाम करणारे इतर हेतूसुद्धा सांगितलेले आहेत ते म्हणजे उपभोगातून मिळणारा आनंद लुटणे, करमणूक, औदार्य, दूरदर्शीपणा, उधळेपणा आणि विलासी वृत्ती इत्यादी.

B) वस्तुनिष्ठ घटक:

१. वेतनाची पातळी:

समाजातील लोकांची उपभोग प्रवृत्ती ही त्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या पातळीवर अवलंबून असते. वेतनाची पातळी वाढल्यास लोकांचे उत्पन्न वाढून त्यांच्या उपभोग खर्चातही वाढ होते.

२. उत्पन्नाची पातळी:

उपभोग खर्च ठरविणारा महत्त्वाचा घटक म्हणजे व्यक्तीची उत्पन्नाची पातळी होय. उत्पन्नाची पातळी वाढल्यास उपभोग खर्चात देखील वाढ होते.

३. उत्पन्नाचे वितरण:

समाजात उत्पन्नाचे वितरण कशाप्रकारे झाले आहे यावर उपभोग खर्च अवलंबून असतो. समाजामध्ये उत्पन्नाच्या वाटपातील विषमता अधिक तीव्र असेल तर उपभोग प्रवृत्ती कमी राहते याउलट उत्पन्नाचे वाटप समान असेल तर उपभोग प्रवृत्ती जास्त राहते.

४. किंमत पातळी:

किंमत पातळीचा देखील उपभोग प्रवृत्ती वर परिणाम होतो. ज्यावेळी किंमत पातळी जास्त असते त्यावेळेस उपभोग प्रवृत्ती घटते याउलट किंमत पातळी कमी होते तेव्हा उपभोग प्रवृत्तीत वाढ घडून येते.

५. व्याजाचा दर:

उपभोग प्रवृत्ती व्याजदरावर देखील अवलंबून असते. कारण व्याजदर जास्त असतील तर लोक अधिक प्रमाणात बचत करतात. याउलट व्याज दर कमी असल्यास बचत कमी होऊन उपभोग प्रवृत्तीत वाढ होते.

६. सरकारी धोरण:

सरकारच्या धोरणांचा देखील परिणाम उपभोग फलनावर होतो. सरकारची वित्तीय धोरणे म्हणजे कर, शासकीय कर्ज व खर्च या धोरणांचा परिणाम उपभोगावर होतो. समजा सरकारने जास्त कर आकारल्यास लोकांच्या उत्पन्नातील बराचसा भाग सरकारकडे हस्तांतरित होतो त्यामुळे लोकांची उपभोग प्रवृत्ती कमी होते. याउलट सरकारने सार्वजनिक खर्चात वाढ केल्यास लोकांचे उत्पन्न वाढून उपभोग खर्चात देखील वाढ होते.

७. अपेक्षांमध्ये घडून येणारे बदल:

भविष्यकाळातील संभाव्य बदलांबाबत लोकांच्या ज्या अपेक्षा असतात. त्यांचा परिणाम उपभोग फलनावर देखील होतो. समजा भविष्यकाळात वस्तूंची टंचाई निर्माण होऊन किंमती वाढतील असे वाटते तेव्हा लोक मोठ्या प्रमाणात वस्तूची खरेदी करतात याचाच अर्थ वर्तमान उपभोग खर्चात वाढ होते.

८. बचत करण्याची प्रवृत्ती:

बचत प्रवृत्ती हा देखील उपभोग फलनावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. समाजातील लोकांची बचत करण्याची प्रवृत्ती जेवढी तीव्र तेवढी उपभोग प्रवृत्ती कमी याउलट बचत प्रवृत्ती कमी असल्यास उपभोग प्रवृत्ती जास्त असते.

अशा प्रकारे उपभोग फलनावर परिणाम करणारे व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ घटक वरीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

बचत : (Saving)

बचत म्हणजे उत्पन्नाचा असा भाग जो उपभोगावर खर्च न करता बाजूला ठेवलेला असतो. बचतीचा उत्पन्नाशी जवळचा संबंध आहे. कारण केन्स यांच्या मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की जसे जसे उत्पन्न वाढते त्याचा उपभोग खर्च कमी होत जातो याचा अर्थ बचती मध्ये वाढ होत जाते.

व्याख्या : उत्पन्नाचा जो भाग उपभोगावर खर्च केला जात नाही त्यास बचत असे म्हणतात.

सूत्ररुपाने - $S = Y - C$

यामध्ये S = बचत

Y = उत्पन्न

C = उपभोग खर्च

बचत फलन संबंध पुढील प्रमाणे ही दाखविता येतो

S = f(Y)

यामध्ये, S = बचत

F = फलनात्मक संबंध

Y = उत्पन्न

उदाहरणार्थ समजा एका व्यक्तीचे उत्पन्न १०० रुपये आहे आणि तो २० रुपये बचत करतो.

सीमांत बचत प्रवृत्ती : (Marginal Propensity to Save)

खर्च शक्य उत्पन्नात बदल होत असताना बचतीत देखील बदल होत असतो. खर्च शक्य उत्पन्नात वाढ झाल्यास बचती मध्येही वाढ होते. सीमांत बचत प्रवृत्ती म्हणजे बचती मधील बदलाचे बदलांचे उत्पन्नातील बदलांची असणारे प्रमाण होय.

सीमांत बचत प्रवृत्ती सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे दाखविता येते.

सीमांत बचत प्रवृत्ती = बचतीतील बदल / उत्पन्नातील बदल

उदाहरणार्थ समजा उत्पन्नात दहा कोटी रुपयांची वाढ झाली तर त्यामुळे बचतीत तीन कोटी रुपयांनी वाढ झाली तर सीमांत बचत प्रवृत्ती किती?

सीमांत बचत प्रवृत्ती = बचती तील बदल / उत्पन्नातील बदल

= 03 /1 0

सीमांत बचत प्रवृत्ती = 0.3 म्हणजेच 30%

बचत फलनाचे निर्धारक घटक :

बचत फलन प्रभावित करणाऱ्या घटकांना किंवा बचत फलनावर परिणाम करणाऱ्या घटकांना बचत फलनाचे निर्धारक

असे म्हणतात.

१. बचत करण्याची इच्छा :

व्यक्तिगत किंवा कौटुंबिक पातळीवर बचत करण्याची इच्छा या घटकाचा बचत फलनावर परिणाम होतो. बचत करण्याची इच्छा, कुटुंबाविषयी आपुलकी, दक्षता, राहणीमानाची पातळी, दुरदर्शीपणा, स्वावलंबन व सामाजिक दर्जा यावर अवलंबून असते.

२. बचत करण्याची शक्ती :

बचत करण्याची शक्ती म्हणजे बचत करण्याची क्षमता होय. बचत करण्याची क्षमता ही उत्पन्न आणि उत्पन्नावर परिणाम करणाऱ्या घटकांवर अवलंबून असते. बचत करण्याची क्षमता ही राष्ट्रीय उत्पन्नाचे आकारमान, नैसर्गिक संसाधने, व्यापार, औद्योगिक विकास, शेती विकास, कामगारांची कार्यक्षमता तसेच उत्पन्न आणि संपत्तीची वाटणी या घटकांवर अवलंबून असते.

३. बचतीसाठी उपलब्ध असणाऱ्या सोई / संधी :

बचतीवर शांतता व सुरक्षितता, बँकविषयक सुविधा, करविषयक धोरण, पैशाचे मूल्य, गुंतवणूक संधी, सरकारचे आर्थिक धोरण या घटकांचा परिणाम होतो.

गुंतवणूक : (Investment)

गुंतवणूक हा समग्रलक्षी आर्थिक विश्लेषणातील महत्त्वाचा घटक आहे. उत्पन्नाची पातळी किंवा रोजगाराची पातळी प्रभावी मागणीवर अवलंबून आहे. प्रभावी मागणी ही उपभोग खर्च आणि गुंतवणूक खर्चावर अवलंबून असते. उत्पन्नाची पातळी प्रामुख्याने गुंतवणुकीवर अवलंबून असते.

केन्स प्रणित अर्थशास्त्रात गुंतवणूक म्हणजे वास्तविक गुंतवणूक होय. गुंतवणूक म्हणजे नवीन यंत्राची उभारणी करणे, उद्योगाची नवीन इमारत, रस्ते बांधणी, पूल बांधणी तसेच इतर उत्पादक भांडवली स्वरूपातील गुंतवणूक होय. वित्तीय दृष्ट्या गुंतवणूक म्हणजे द्रव्य विषयक मालमत्ता खरेदी करून नंतर त्या मालमत्तेची जास्त किंमतीला विक्री करून भविष्यकाळात फायदा मिळविणे होय. तर अर्थशास्त्रीय दृष्ट्या गुंतवणूक म्हणजे वस्तू खरेदी करणे होय.

भविष्यकाळात उत्पन्न किंवा उत्पादन वाढविण्यासाठी साधनसंपत्तीचा केलेला वापर म्हणजे गुंतवणूक होय. गुंतवणूक ही एक प्रकारची मालमत्ता असते.

गुंतवणूकीचे प्रकार :

१. स्थूल आणि निव्वळ गुंतवणूक: (Gross & Net Investment)

स्थूल गुंतवणूक : एका विशिष्ट कालावधी स्थिर भांडवली वस्तू कच्च्या मालाच्या साठ्यातील वाढ आणि विक्री न झालेल्या उपभोग्य वस्तूवर केल्या जाणाऱ्या खर्चाला स्थूल गुंतवणूक असे म्हणतात. राष्ट्रीय जमा खर्चाच्या संदर्भात घसारा वजा करण्यापूर्वी भांडवलाचे जे मूल्य असते त्यास स्थूल गुंतवणूक म्हणतात.

उत्पन्न व रोजगार सिद्धांतानुसार स्थूल गुंतवणूक म्हणजे राष्ट्राच्या भौतिक भांडवली साठ्यात पडणारी भर होय. उदाहरणार्थ नवीन कारखाने नवीन यंत्रे इत्यादी.

स्थूल गुंतवणूक = निव्वळ गुंतवणूक + घसारा

निव्वळ गुंतवणूक :

गुंतवणूकीतून भांडवलाची अथवा घसारा मूल्य वजा केल्यावर राहणारी गुंतवणूक म्हणजे निव्वळ गुंतवणूक होय.

निव्वळ गुंतवणूक = गुंतवणूक - घसारा

घसारा म्हणजे उत्पादनात यंत्रसामग्रीचा सातत्याने दीर्घकाळ वापर होत असताना भांडवलाची जी झीज होत असते त्यास घसारा म्हणतात. घसाऱ्यामध्ये यंत्रसामुग्री दुरुस्तीवरील खर्च, सर्विसिंग, तेल, पाणी इत्यादी.

२. स्वायत्त व प्रेरित गुंतवणूक: (Autonomous & Induced Investment)

स्वायत्त गुंतवणूक :

स्वयं गुंतवणूक म्हणजे उत्पन्नातील बदलापासून स्वतंत्र असलेली आणि नफा मिळविण्याच्या उद्देशाने प्रेरित नसलेली गुंतवणूक होय. अशा प्रकारची गुंतवणूक सरकारद्वारे केली जाते साधारणपणे ही गुंतवणूक आधारभूत संरचनेच्या विकासासाठी केली जाते. यामध्ये वाहतूक-दळणवळण, सामाजिक सेवा यासारख्या मूलभूत सुविधांचा समावेश होतो.

गुंतवणुकीची वैशिष्टे :

१. गुंतवणूक उत्पन्न, उत्पादन किंवा नफ्याच्या उद्देशाने प्रेरित नसते.

२. राजकीय किंवा आर्थिक असते त्यामुळे सामाजिक कल्याण, आधारभूत रचना, भांडवल निर्मिती इत्यादीला अग्रक्रम दिला जातो.

३. गुंतवणूक नियोजित अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

४. जेव्हा खाजगी गुंतवणूकदार गुंतवणूक करत नाही तेव्हा सरकारद्वारे रोजगार, उत्पन्न आणि उपभोगात वाढ करण्यासाठी अशा स्वरूपाची गुंतवणूक केली जाते.

प्रेरित गुंतवणूक :

उत्पादन वाढविण्याच्या हेतूने, उद्देशाने आणि व्याजदरापेक्षा जास्त नफा मिळविण्यासाठी खाजगी गुंतवणूकदारांनी केलेल्या गुंतवणुकीला प्रेरित गुंतवणूक म्हणतात.

प्रेरित गुंतवणूक यांची वैशिष्ट्ये :

१. उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने खाजगी गुंतवणूकदार ही गुंतवणूक वाढवितात.

२. बाजारातील वाढीव मागणी पूर्ण करण्यासाठी प्रेरित गुंतवणूक केली जाते.

३. प्रेरित गुंतवणुकीचे दोन महत्त्वाचे निर्धारक घटक म्हणजे भांडवलाची सीमांत लाभ क्षमता आणि व्याजाचा दर होय.

४. गुंतवणूक उत्पन्नाच्या पातळीवरती अवलंबून असते.

५. गुंतवणूक व्यवसायिक स्थितीवर अवलंबून असते.

भांडवलाची सीमांत लाभक्षमता : (Marginal Efficiency of Capital)

भांडवलाची सीमांत लाभक्षमता म्हणजे भांडवलाच्या लाभाचा अपेक्षित दर होय. एखादा उद्योजक भांडवलाची एक जास्तीची मात्रा आपल्या उत्पादनात वापरतो तेव्हा त्यासाठी त्या उद्योजकाला व्याजाच्या रुपाने काही खर्च सहन करावा लागतो. अशा वेळी तो उद्योजक या जास्तीच्या मात्रेपासून काही प्राप्ती किंवा लाभ अपेक्षित धरतो त्यास भांडवलाची सीमांत लाभक्षमता अथवा कार्यक्षमता असे म्हणतात.

थोडक्यात, नव्याने गुंतविलेल्या भांडवला पासूनचा अपेक्षित प्राप्तीचा दर म्हणजे भांडवलाची सीमांत लाभ क्षमता होय.

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता मापनाचे सूत्र :

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता = संभाव्य उत्पन्न / पुरवठा किंमत * १००

उदाहरणार्थ समजा एका कारखान्यात एक नवीन यंत्र खरेदी करण्यात आले. यंत्राची पुरवठा किंमत एक लाख रुपये आहे. यंत्राचे आयुष्य दहा वर्ष आहे त्या यंत्राच्या वापरामुळे प्रतिवर्षी दहा हजार रुपये वाढीव लाभ मिळतो. तर भांडवलाची सीमांत कार्यक्षमता किती?

भांडवलाची सीमांत कार्यक्षमता = १००००० / १०००० * १००

= १० %

वरील उदाहरणात प्रतिवर्षी भांडवलाची सीमांत कार्यक्षमता १० टक्के आहे.

संभाव्य लाभ / उत्पन्न म्हणजे भांडवली वस्तूंच्या आयुष्यात मिळणारा एकूण निव्वळ लाभ होय. तर पुरवठा किंमत म्हणजे नवीन भांडवली वस्तू खरेदी करण्यासाठी येणारा खर्च होय.

भांडवलाच्या सीमांत कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक : (Factor Affecting Marginal Efficiency of Capital)

भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर परिणाम करणाऱ्या घटकांची विभागणी अल्पकालीन घटक व दीर्घकालीन घटक अशा दोन भागांमध्ये केली जाते.

A) अल्पकालीन घटक:

अल्पकाळात उत्पादन तंत्र, उत्पन्न आणि लोकसंख्येत फारसा बदल होत नसल्याने भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर परिणाम होत नाही. अल्पकाळात भांडवलाच्या सीमांत लागत क्षमतेवर परिणाम होतो.

१. अपेक्षित मागणी :

उत्पादित होणाऱ्या वस्तूंची मागणी भविष्यकाळात वाढेल अशी उद्‌योजकांची अपेक्षा असेल तर भांडवलाची लाभक्षमता वाढेल याउलट भविष्यकाळात आपल्या उत्पादनात कमी मागणी येईल असा अंदाज असेल तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी होते.

२. उपभोग प्रवृत्ती:

उपभोग प्रवृत्ती वाढली तर विविध वस्तू व सेवांची मागणी वाढून भांडवलाची सीमांत लाभ क्षमता वाढेल. याउलट उपभोग प्रवृत्ती घटली तर वस्तू व सेवा यांची मागणी कमी होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी होईल.

३. भांडवली वस्तूंची पुरवठा किंमत :

भांडवलाची सीमांत लाभक्षमता ही भांडवली वस्तूपासून तिच्या संपूर्ण आयुष्यात मिळणारे अपेक्षित उत्पन्न आणि भांडवली वस्तूंची पुरवठा किंमत यावर अवलंबून असते. भांडवली वस्तूंची पुरवठा किंमत वाढली तर उत्पादन खर्चात वाढ होऊन नफ्याचे प्रमाण म्हणजेच भांडवलाची सीमांत लाभक्षमत कमी होते. भांडवली वस्तूची पुरवठा किंमत कमी झाल्यास उत्पादन खर्च कमी होऊन भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत वाढ होते.

४. खर्च व किंमत :

भावी काळात खर्च वाढण्याची परंतु किमती न वाढण्याची उद्‌योजकांची अपेक्षा असेल तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता घटेल. याउलट खर्च कमी होण्याची व किमती वाढण्याची अपेक्षा असेल तर सीमांत लाभक्षमता वाढेल.

५. उत्पन्नातील अनपेक्षित बदल :

काही वेळा उपभोगत्यांच्या उत्पन्नात अनपेक्षित बदल होतो. उदाहरणार्थ लॉटरी लागली, बोनस मिळाला तर उपभोग त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्या वस्तूंची मागणी वाढते. मागणी वाढल्यामुळे किंमती वाढून नफ्याचे प्रमाण म्हणजे भांडवलाची सीमान्त लाभक्षमता घटते.

६. प्रचलित नफ्याचा दर :

प्रचलित नफ्याचा दर भविष्यकाळात अधिक राहील अशी उद्योजकांची अपेक्षा असेल तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढून गुंतवणुकीला उत्तेजन मिळते. याउलट वर्तमानकाळात नफ्याचा दर कमी असेल आणि भविष्यकाळात देखील कमी राहील अशी उद्योजकांची अपेक्षा असेल तर किमान लाभक्षमतेत घट होते.

७. संयोजकांजवळील रोखता :

संयोजकाजवळ जास्त रोखता असेल किंवा संयोजकांना सहज कर्ज मिळण्याची शक्यता असेल तर गुंतवणूक वाढवून भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढेल.

ब) दीर्घकालीन घटक :

या घटकांना बाह्य घटक असे देखील म्हणतात. भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर दीर्घकालीन गतिमान अशा बाह्य घटकांचा परिणाम होतो हे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

१. लोकसंख्या वाढ :

लोकसंख्येत जशी वाढ होत जाईल तसतशी वस्तूंची मागणी वाढून भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढेल. याउलट लोकसंख्येत घट झाली तर वस्तूंची मागणी कमी होऊन भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी होईल.

२. तांत्रिक शोध किंवा नवप्रवर्तन :

तांत्रिक शोध किंवा नवप्रवर्तन यामुळे गुंतवणुकीला चालना मिळते. त्यामुळे भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत वाढ होते.

३. नवीन क्षेत्रातील गुंतवणूक संधी :

नवीन प्रदेशात रस्ते, वीज, जलसिंचन, उद्योग या क्षेत्रात गुंतवणुकीच्या संधी वाढल्यावर भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत वाढ होईल.

४. अस्तित्वातील उत्पादन क्षमतेचा वापर :

अस्तित्वात असणाऱ्या उत्पादन क्षमतेचा पुरेपूर वापर केला तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढेल.

५. नैसर्गिक साधने :

भूमी ही निसर्गदत्त देणगी आहे. जर नैसर्गिक साधने विपुल असतील तर भांडवलाची सीमांचा लाभक्षमता वाढून गुंतवणुकीला चालना मिळेल.

६. राजकीय परिस्थिती :

देशांमध्ये राजकीय परिस्थिती स्थिर स्वरूपाचे असेल तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता वाढवून गुंतवणुकीला चालना मिळेल. याउलट देशात राजकीय परिस्थिती अस्थिर असेल तर भांडवलाची सीमांत लाभक्षमता कमी होईल.

७. आंतरराष्ट्रीय व्यापार :

आंतरराष्ट्रीय व्यापारात निर्यात वाढण्याची शक्यता असेल तर भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत वाढ होते व गुंतवणुकीत वाढ होते. याउलट निर्यात वाढण्याची शक्यता नसेल तर भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेत घट होऊन

गुंतवणुकीत घट होते. अशाप्रकारे भांडवलाच्या सीमांत लाभक्षमतेवर अल्प आणि दीर्घकालीन घटकांचा परिणाम होतो.

गुंतवणूक गुणक : (Investment Multiplier)

गुंतवणूक गुणक ही संकल्पना नट विकसेल यांनी Interest and Price या पुस्तकात मांडली. त्यानंतर गुणकाची संकल्पना आर.एफ.कान्ह यांनी 1931 मध्ये इकॉनॉमिक्स जर्नल मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'The Relation of home investment to unemployment' या लेखामध्ये मांडली. पुढे प्रा.केन्स यांनी गुंतवणूक गुणक ही संकल्पना विस्तारित स्वरूपात मांडली. गुणक ही संकल्पना गुंतवणूक खर्चातील बदलाचा प्रेरित उपभोग खर्चद्वारे एकूण उत्पन्नावर होणारा परिणाम स्पष्ट करते. म्हणूनच गुंतवणूक गुणक या संकल्पनेला उत्पन्न गुणक असेही म्हटले जाते. गुंतवणुकीमध्ये सुरुवातीला करण्यात आलेली वाढ व त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात झालेली अंतिम वाढ या दोघांमधील संबंध स्पष्ट करणारी संकल्पना म्हणजे गुंतवणूक गुणक होय. थोडक्यात एकूण उत्पन्नात होणारा बदल आणि एकूण गुंतवणुकीत होणारा बदल यांचे गुणोत्तर म्हणजे गुणक होय.

सूत्ररुपाने,

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

यामध्ये, K = गुणक

ΔY = उत्पन्नातील बदल

ΔI = गुंतवणुकीतील बदल

उदाहरणार्थ, समजा गुंतवणुकीमध्ये चार कोटी रुपयांची वाढ केली तर एकूण उत्पन्न आठ कोटी रुपयांनी वाढ होते म्हणून गुंतवणूक दोन आहे.

गुंतवणूक गुणकाचे महत्व :

केन्सच्या गुंतवणूक गुणकचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते-

१. गुंतवणुकीचे महत्त्व स्पष्ट होते :

केन्सच्या मते सर्वसाधारणपणे व्यक्तीची सीमांत उपभोग प्रवृत्ती शून्यापेक्षा जास्त व एकापेक्षा कमी असते. याचा अर्थ व्यक्ती आपल्याला मिळालेले सर्वच्या सर्व उत्पन्न उपभोगावर खर्च न करता त्यातील काही भागाची बचत करते. या बचतीचे गुंतवणुकीमध्ये रूपांतर होणे आवश्यक असते. गुंतवणुकीमुळे रोजगारात वाढ होतेच पण राष्ट्रीय उत्पन्नात गुणकपट वाढ होते.

२. आर्थिक मंदी व बेरोजगारीच्या काळात उपयुक्त :

आर्थिक मंदीच्या काळात रोजगार व उत्पन्नात वाढ करण्यासाठी सरकारने किती गुंतवणूक करणे आवश्यक आहे.याची गुणक तत्वावरून कल्पना येते.

३. आर्थिक धोरणे निश्चित करण्यासाठी :

आर्थिक धोरणे निश्चित करण्याच्या बाबतीत गुंतवणूक गुणकाची संकल्पना उपयोगी ठरते. उदाहरणार्थ व्यापारचक्र नियंत्रित करणे, सार्वजनिक गुंतवणूक, तुटीचा अर्थभरणा इत्यादीबाबत गुंतवणूक गुणक संकल्पना महत्त्वपूर्ण ठरते.

४. सरकारी हस्तक्षेपाचे महत्त्व :

अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप आहे अथवा नाही याची कल्पना गुणक तत्वावरून येते. थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी, पूर्ण रोजगारासाठी तसेच विविध धोरणे निश्चित करण्यासाठी आणि उत्पन्न, रोजगार, गुंतवणूक या घटकांच्या दृष्टीने गुंतवणूक ही संकल्पना महत्त्वपूर्ण आहे.

प्रवेग किंवा त्वरक तत्व : (Acceleration Principal)

प्रवेग या तत्वाची मांडणी १९०३ मध्ये टी.एन.कारव्हर यांनी केली. परंतु खऱ्या अर्थाने या तत्वाला लोकप्रिय करण्याचे कार्य अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा.जे.एम.क्लार्क यांनी १९४४ मध्ये हे तत्व विकसित करून केले. गुणक हा गुंतवणुकीचा उपभोग उत्पन्न आणि रोजगारावरील परिणाम दर्शवितो तर प्रवेग उपभोगातील बदलांचा गुंतवणुकीवरील परिणाम दर्शवितो.

प्रवेग तत्व हे प्रामुख्याने प्रेरित गुंतवणूक प्रकाराशी संबंधित आहे. उपभोग खर्चातील वाढीमुळे जी गुंतवणूक करण्यात येते तिला प्रेरित गुंतवणूक म्हणतात.

प्रवेग तत्व उपभोग खर्चातील वाढीचा प्रेरित गुंतवणुकीवरील परिणाम स्पष्ट करतो.

व्याख्या : प्रेरित गुंतवणुकीतील बदल आणि उपभोग खर्चातील बदल यांचे गुणोत्तर म्हणजे प्रवेग होय.

सूत्ररूपाने -

$$a = \frac{\Delta I}{\Delta C}$$

यामध्ये, a = प्रवेग

ΔI = गुंतवणुकीतील बदल

Δc = उपभोग खर्चातील बदल

म्हणजेच,

$$\text{प्रवेग} = \frac{\text{प्रेरित गुंतवणुकीतील बदल}}{\text{उपभोग खर्चात होणारा बदल}}$$

समजा उपभोग खर्च २५ कोटी रु. वाढला व गुंतवणूक ५० कोटी रु. वाढत असेल तर प्रवेग २ येईल.